दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १७२ • RNI : MAHMAR/2023/87818 • शनिवार, दि.२६ एप्रिल २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
कोळोना (रोडेगाव), पुलगाव जवळ, ता. देवळी जि. वर्धा

# पहलगामच्या आरोपींना पूर्णपणे संपवण्याचे काम भारतीय सेना करेल

## तिळमात्र शंका नसल्याचे म्हणत अजित पवारांनी व्यक्त केला विश्वास

**पुणे (वृत्तसंस्था)–पहलगाम येथे दहशतवादी हल्ला करण्याचा विचार ज्याच्या डोक्यात आला, त्याला पूर्णपणे संपवण्याचे काम भारतीय सेना करेल, याबद्दल माझ्या मनात कोणतीही शंका नसल्याचा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यासंदर्भात अनेक कठोर भूमिका घेतलेली आहे. पाकिस्तानशी सर्व संबंध तोडले आहेत. ते याबाबत कठोर कारवाई करतील, असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला. पुणे येथे आरोग्य विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.**

पालघर येथे मृत्यू मुखी पडलेल्या २७ भारतीय आणि त्यामध्ये महाराष्ट्रातील सहा नागरिकांना देखील आपण श्रद्धांजली अर्पण केली आहे. मात्र, ही घटना घडली असून आजही संपूर्ण भारत अक्षरशः याचा बदला घेतला पाहिजे, या मताचा आहे. त्यांना त्यांची जागा दाखवली पाहिजे, ही लोकांची भावना आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील यामध्ये काही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. यामध्ये पाण्याचा किंवा इतर संदर्भातील गोष्टी असतील, पाकिस्तानशी असलेले सर्व संबंध तोडून टाकले असल्याचेही अजित पवार यांनी म्हटले आहे.



**“लोक पर्यटनासाठी जात असतात. त्यांच्यावर अशा पद्धतीने भ्याड हल्ले होतात. याचा सर्वजण तीव्र शब्दात निषेध करतात. या गोष्टी कदापि होता कामा नाही, असे देखील अजित पवार यांनी म्हटले आहे. यामुळे ज्याच्या डोक्यातून ही गोष्ट पुढे आली आहे, त्या सर्वांना पूर्णपणे संपवण्याचे काम आपले भारतीय सैनिक करतील, यामध्ये माझ्या मनात तिळमात्र शंका नसल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे.सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने आज राज्य कुटुंब कल्याण भवन आणि प्रशिक्षण केंद्र पुणे या इमारतीचे भूमिपूजन समारंभ आयोजित करण्यात आला होता. या वेळी अजित पवार यांच्या हस्ते हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ४३ दवाखान्याचे लोकार्पण करण्यात आले.**

## दैनिक सह्याद्रीचा राखणदारच्या आठवणीतील लोकनेते’ स्मृतिदिन विशेष पुरवणीचे प्रकाशन!



**वरोरा विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार, माजी सांस्कृतिक व पर्यावरण मंत्री स्व. संजय बाबू देवतळे यांच्या चतुर्थ स्मृतिदिनानिमित्त, दैनिक सह्याद्रीचा राखणदार ने आठवणीतील लोकनेते’ ही विशेष स्मृतिपुरवणी प्रकाशित केली .या विशेष पुरवणीचे प्रकाशन महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी हंसराज अहिर (अध्यक्ष, केंद्रीय मागासवर्गीय आयोग),आमदार करण देवतळे,आमदार किशोर जोरगेवार, माजी आमदार सुभाष धोटे, जिल्हाधिकारी विनय गौडा, डॉ. विजय देवतळे, श्रीमती श्वेता संजय देवतळे, नयोमी साटम (उपविभागीय पोलीस अधिकारी) आदी मान्यवरांचीप्रमुख उपस्थिती होती.**

## रखरखत्या उन्हात जिल्हाधिकारी फिल्डवर

## क्षेत्रीय भेटीदरम्यान जाणून घेतल्या मजुरांच्या समस्या

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या १०० दिवस कृती आराखड्यांतर्गत जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. हे जिल्ह्यातील विविध ठिकाणी क्षेत्रीय भेटी देऊन विकासकामांची पाहणी करीत आहे. गत आठवड्यापासून जिल्ह्यात उन्हाचा तडाखा चांगलाच बसत असला तरी त्याची पर्वा न करता भर उन्हात जिल्हाधिका–यांनी पोंभुर्णा तालुक्यात भेट देऊन मजुरांशी संवाद साधला.

२३ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी श्री. गौडा यांनी पोंभुर्णा तालुक्यातील मौजा घनोटी तुकूम येथील मजगी कामाची पाहणी केली. यावेळी तेथे कामावर असलेल्या कामगारांशी त्यांनी संवाद साधला आणि त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. तसेच त्यांना मार्गदर्शन सुध्दा केले. यावेळी जिल्हाधिका–यांनी तालुक्यातील विविध



विकासकामांना भेटी देऊन प्रगतीचा आढावा घेतला.

क्षेत्रीय भेटीदरम्यान मौजा आंबेधानोरा येथे अंगणवाडी केंद्राला भेट देऊन पाहणी केली. तसेच तलाठी कार्यालयाची तपासणी करून मार्गदर्शन केले. यानंतर जिल्हाधिकारी श्री. गौडा यांनी मौजा उमरी पोतदार येथील नवीन प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीला भेट देऊन पाहणी केली. तसेच बळीराजा शेत पाणंद रस्ताच्या कामाला भेट दिली. पोंभुर्णा येथील ग्रामीण रुग्णालयास भेट देऊन जिल्हाधिकारी श्री. गौडा यांनी वैद्यकीय अधिका–यांसोबत रुग्णालयातील वार्ड, भरती असलेले रुग्ण, त्यातील यंत्र सामुग्री, औषध उपलब्धता व इतर आरोग्य विषयक सोई सुविधाबाबत तपासणी करून आढावा घेतला. तसेच पोंभूर्णा येथील महिला आर्थिक विकास महामंडळातर्फे अगरबत्ती प्रकल्पाची सुध्दा त्यांनी पाहणी केली. मौजा चिंतलधाबा येथील ग्रामपंचायत क्रीडांगण काम, मनरेगा अंतर्गत ६५० वृक्ष लागवड केलेल्या कामास भेट देऊन मार्गदर्शन केले.सदर दौ–याच्या वेळी गोंडपिपरीचे उपविभागीय अधिकारी रविंद्र माने, तहसीलदार रेखा वाणी, गटविकास अधिकारी विवेक बेल्लालवार, जि.पं.बांधकाम उपविभागीय अभियंता श्रीमती जोशी, पोलीस निरिक्षक राजकमल वाघमारे, नायब तहसिलदार रामकृष्ण उईके, मंडळ अधिकारी दिनकर शेडमाके व सुरेंद्र चिडे यांच्यासह गटशिक्षण अधिकारी, विस्तार अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, सरपंच, सहा.कार्यक्रम अधिकारी, तांत्रिक सहाय्यक, ग्रामरोजगार सहाय्यक व गावातील नागरीक उपस्थित होते.

## बाभुळगाव खुर्दमध्ये महिलांचा हंडा मोर्चा पाणीटंचाई व अस्वच्छतेविरोधात संतप्त आंदोलन

**वैजापूर । अर्जुन शिंदे**

बाभुळगाव खुर्द येथील दिवसेंदिवस तीव्र होत चाललेल्या पाणीटंचाईसह गटारींच्या अस्वच्छतेविरोधात गावातील महिलांनी गुरुवारी दुपारी ग्रामपंचायतीवर हंडा मोर्चा काढत प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न केला. या आंदोलनात महिलांसोबत गावातील युवकांनीही सक्रिय सहभाग घेत ग्रामपंचायतीसमोर संतप्त व्यथा मांडली.

हातात पाणी भरलेले हंडे आणि निधी नसेल तर आम्ही वर्गणी देऊ अशा आशयाचे फलक घेऊन महिलांनी ग्रामपंचायत कार्यालयावर मोर्चा काढला. पाण्याचा नियमित पुरवठा न झाल्यामुळे ग्रामस्थ त्रस्त असून, नळाला दिवसातून एकदाही पाणी येत नसल्याची जोरदार तक्रार त्यांनी केली.



त्यातच गावातील गटारींची सफाई न झाल्याने दुर्गंधी आणि रोगराईचा धोका वाढला आहे.ग्रामस्थांनी सरपंच व ग्रामसेवक यांना सात दिवसांचा अल्टिमेटम दिला असून, त्यावधीत समस्या सोडवण्यात अपयश आल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. पाण्याचा कायमस्वरूपी प्रश्न सोडवावा, नियमित सफाई व्यवस्था सुरू करावी, अशा मागण्यांचे निवेदनही ग्रामपंचायतीला सादर करण्यात आले.

## उपमुख्यमंत्री अजित पवार २६ एप्रिल रोजी परभणी दौऱ्यावर

### जिल्हास्तरीय आढावा बैठक व विकासकामांचा पाहणी दौरा

**परभणी । प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार शनिवारी, २६ एप्रिल रोजी परभणी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून, त्यांच्या दौऱ्यात विविध विकासकामांचा आढावा घेण्यात येणार आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आगमन शनिवारी सकाळी ९.३० वाजता नांदेडहून मोटारीने श्री क्षेत्र नृसिंह मंदिर, पोखर्णी येथे होणार आहे. दर्शनानंतर ते मोटारीने परभणीकडे प्रयाण करतील.

सकाळी १०.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय विविध विकास योजनांचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली आहे. त्यानंतर दुपारी १२ वाजता अजित पवार परभणी महानगरपालिका कार्यालयात भेट देऊन महानगरपालिकेअंतर्गत सुरु असलेल्या विविध विकासकामांची माहिती घेतील.दुपारी १ वाजता त्यांचे अक्षदा मंगल कार्यालय, परभणी येथे आगमन होईल. यानंतर दुपारी २ वाजता व सायंकाळी ५ वाजता मौ. गुंज, ता. वसमत, जि. हिंगोली येथे ते भेट देतील.



## आंबापाडा येथे दारूसाठी आईचा खून करणाऱ्या मुलाला जन्मठेपेची शिक्षा

**धुळे । उमाकांत अहिरराव**

साक्री तालुक्यातील आंबापाडा गावात दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याने मुलाने आपल्या आईची हत्या केली. या नराधम मुलाला धुळ्याच्या सत्र न्यायालयाने पाच वर्षानंतर जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

सुमनबाई बंडू बागुल या पीडितेच्या मुलाने ३० सप्टेंबर २०२१ रोजी सायंकाळी आपल्या आईकडून दारू पिण्यासाठी पैसे मागितले. आईने नकार दिल्यामुळे मुलाने रागाच्या भरात सुमनबाईला मारहाण केली. त्यानंतर त्याने तिचे डोके भिंतीवर आणि जमिनीवर आपटले, ज्यामुळे गंभीर जखमी होऊन तिचा मृत्यू झाला.

या प्रकरणी पिंपळनेर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन साळुंखे यांनी तपास करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. सरकारी अभियोक्ता पराग पाटील यांनी महत्त्वाचे साक्षीदार आणि पुरावे सादर केल्यामुळे न्यायालयाने आरोपी गुलाब बंडू बागुल याला खूनाचा दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा दिली. या खटल्याच्या निकालाने एका नराधम मुलाच्या कृत्याला योग्य न्याय मिळाला आहे, तसेच समाजात इतरांना ही कठोर शिक्षा एक चेतावणी ठरेल.




## शेतकऱ्यांच्या सोयी, गरजा आणि अडचणी केंद्रस्थानी ठेवून नियोजन करा–आ.जोरगेवार

### कृषी विभागाच्या वतीने खरीप हंगाम २०२५–२६ तालुकास्तरीय नियोजन बैठकीचे आयोजन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शेती हा आपल्या जिल्ह्याचा आत्मा आहे. आपला शेतकरी दिवसरात्र राबतो, उन्हातान्हात शेतात घाम गाळतो. पण कधी पावसाचा लहरीपणा, तर कधी बाजारभावातील चढ–उतार यामुळे त्याला नफा मिळतोच असे नाही. म्हणूनच या खरीप हंगामासाठी नियोजन करताना शेतकऱ्यांच्या सोयी, गरजा आणि अडचणी केंद्रस्थानी ठेवणं अत्यंत आवश्यक आहे. असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

कृषी विभागाच्या वतीने प्रकल्प संचालक आत्मा कार्यालयाच्या सभागृहात खरीप हंगाम २०२५–२६ संदर्भातील तालुकास्तरीय नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



यावेळी कृषी क्षेत्रात नाविन्यपूर्ण काम करणाऱ्या शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात आमदार किशोर जोरगेवार बोलत होते.यावेळी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर तोरावार, चंद्रपूर कृषी अधिकारी गजानंद पवार, तालुका कृषी अधिकारी अनिकेत अमाणे, नामदेव डाहुळे, कापूस संशोधक श्रीकांत अमरशेट्टीवार आदी मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती.यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले, आजच्या या बैठकीत खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर कोणती बियाणं उपलब्ध आहेत, खतांचा पुरवठा योग्य वेळी होईल का, शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ सुलभतेने मिळेल का, यासारख्या सर्व गोष्टींचा आपण आढावा घेतला आहे. शासन अनेक योजना राबवत आहे. त्या योजनांचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी अधिकाऱ्यांनी जबाबदारीने काम करावे.तुमच्या कष्टाला योग्य दाद मिळावी, तुमच्या चेहऱ्यावर समाधानाचं हास्य यावं, हेच माझं स्वप्न आहे. आपल्या मातीत, आपल्या हातात आणि आपल्या घामात या देशाचं भविष्य दडलेलं आहे. बियाण्यांचं वेळेवर वितरण, खते, कीडनाशके यांचं योग्य नियोजन, पाणीपुरवठ्याचा प्रश्न, नैसर्गिक आपत्तींवरची तयारी या सगळ्या बाबींवर अधिकाऱ्यांनी तातडीने व परिणामकारक कृती केली पाहिजे.शेतकरी तक्रार घेऊन आला तर ती फाईलवर नको, तर कृतीवर दिसली पाहिजे, असेही आमदार किशोर जोरगेवार यांनी ठामपणे सांगितले. या कार्यक्रमाला शेतकरी बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# हदगाव तालुक्यात तंत्रशिक्षणाचा नवा अध्याय : गोविंदरराव पाटील पऊळ संकुलात पॉलिटेक्निक अभ्यासक्रमास एआयसीटीई मान्यता

## २०२५-२६ पासून इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्युटर सायन्स, आय टी मध्ये पदविका अभ्यासक्रम सुरू; ग्रामीण विद्यार्थ्यांना स्थानिक पातळीवर तांत्रिक शिक्षणाची संधी

**नांदेड । बालाजी पाटील**

हदगाव तालुक्याच्या शैक्षणिक इतिहासात एक महत्त्वाचा टप्पा म्हणून गणला जाईल, अशी नवी भर पडली आहे. ग्रामविकास सेवाभावी संस्था, नांदेडच्या अंतर्गत येणाऱ्या गोविंदरराव पाटील पऊळ शैक्षणिक संकुल, हदगाव येथे ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन (एआयसीटीई), नवी दिल्ली या केंद्रीय संस्थेची मान्यता प्राप्त करत पॉलिटेक्निक (तंत्रनिकेतन) अभ्यासक्रम सुरू होणार आहे. या महाविद्यालयात इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलीकम्युनिकेशन, कॉम्प्युटर सायन्स, माहिती तंत्रज्ञान (आयटी) या रोजगाराभिमुख शाखांमध्ये पदविका अभ्यासक्रम उपलब्ध असणार आहेत. हे अभ्यासक्रम २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून सुरू होणार असून, प्रवेशासाठी इयत्ता दहावी, बारावी किंवा आयटीआय उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पात्रता राहणार आहे. ग्रामविकास सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा लताताई शामसुंदर कदम यांच्या नेतृत्वाखाली या संस्थेने ग्रामीण भागात व्यावसायिक शिक्षणाचा दर्जा उंचावण्याचे मोलाचे कार्य केले आहे. याआधीही या संस्थेच्या माध्यमातून एएनएम, जीएनएम , कृषी डिप्लोमा, बीसीए, बीएससी, तसेच विविध पॅरामेडिकल अभ्यासक्रम यशस्वीरित्या राबवले जात आहेत. नांदेड ते यवतमाळ या सुमारे २०० किलोमीटरच्या परिसरात हे एकमेव पॉलिटेक्निक कॉलेज असणार असून, त्यामुळे विशेषतः ग्रामीण मुलींना शहरात जावे लागण्याची आवश्यकता टळणार आहे. स्थानिक पातळीवरच दर्जेदार तांत्रिक शिक्षण उपलब्ध होणार असल्याने पालकांनाही दिलासा मिळणार आहे. सद्यस्थितीत ग्रामीण भागातील विद्यार्थी तांत्रिक शिक्षणासाठी मोठ्या शहरांचा आधार घेतात, जे वेळ, खर्च व सुरक्षिततेच्या दृष्टीने आव्हानात्मक असते. मात्र हदगावातच अशा स्वरूपाचे महाविद्यालय उपलब्ध झाल्यामुळे स्थानिक तरुणांना दर्जेदार शिक्षण आणि रोजगाराच्या संधी मिळणार आहेत. या उपक्रमामुळे हदगाव तालुक्यात तांत्रिक शिक्षणाचा नव्या अध्यायास सुरुवात झाली असून, हा निर्णय तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी एक दिशादर्शक पाऊल ठरणार आहे. उत्तम पायाभूत सुविधा, गुणवत्तापूर्ण अध्यापन आणि ग्रामीण विद्यार्थ्यांच्या विकासासाठी आम्ही कटीबद्ध आहोत. मर्यादित जागा असल्यामुळे इच्छुक विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन संस्थेचे सचिव शामसुंदर कदम यांनी केले आहे.



### डॉ.दत्ता विघावे यांची आंतरराष्ट्रीय गगनभरारी

# रशियन, ऑस्ट्रेलियन आणि नासाच्या उपक्रमांमध्ये सन्मान

**अहिल्यानगर । वजीर शेख**

शिक्षण, क्रिडा, सामाजिक कार्य आणि साहित्य क्षेत्रात आपल्या अष्टपैलू कार्याची ठसा उमठवणारे डॉ. दत्ता विघावे आता थेट आंतरराष्ट्रीय अवकाश संशोधन संस्थांच्या नजरेत भरले आहेत. रशियन स्पेस एजन्सी 'जिओस्कॅन', ऑस्ट्रेलियन 'ग्रिफिथ युनिव्हर्सिटी' आणि अमेरिकेच्या 'नासा' या तीन संस्थांकडून त्यांना अनुक्रमे २०२५ मध्ये विविध गगनभरारी योजनांमध्ये सहभागी करून घेण्यात येत आहे. 'जिओस्कॅन'च्या 'अल्फेरोव्ह २३९' या उपग्रहातून निवडक जागतिक प्रतिभावंतांच्या नावासह डॉ. विघावे यांचे परिचय व छायाचित्र अंतराळात झेपावणार आहे. त्याचप्रमाणे, ऑस्ट्रेलियन 'मिशन प्लॅटिपस-२०२५' अंतर्गत 'क्यूबसॅट' उपग्रहामध्येही त्यांचा परिचय जागतिक विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरण्यासाठी समाविष्ट होणार आहे.



नासाच्या ४ ऑक्टोबर २०२५ रोजी होणाऱ्या 'इंटरनॅशनल ऑब्झर्व्ह द मून नाईट' कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी डॉ. विघावे यांना खास आमंत्रण देण्यात आले असून त्यांना अधिकृत सहभाग प्रमाणपत्रही देण्यात आले आहे.

शिक्षक, क्रिकेट पंच, प्रशिक्षक, पर्यावरणप्रेमी, लेखक आणि सामाजिक कार्यकर्ता अशा विविध भूमिका निभावणाऱ्या डॉ. विघावे यांनी आतापर्यंत पाच विश्वविक्रम प्रस्थापित केले असून सहाव्याच्या प्रतीक्षेत आहेत. कोरोना काळात केलेल्या सेवाकार्यातून ते विशेष प्रेरणादायी ठरले. तसेच 'वर्ल्ड पार्लमेंट इंटरनॅशनल अवॉर्ड'ची संकल्पनाही त्यांनी मांडली आहे.

भारत सरकारचा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार', 'ग्लोबल पीस अवॉर्ड', अमेरिकन विद्यापीठाची मानद डॉक्टरेट, यु.एन.च्या टॅलेंट पूल सदस्यत्वासह अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय गौरव त्यांनी मिळवले आहेत.

'संपूर्ण जग हेच आपले कुटुंब' या तत्त्वाने प्रेरित होऊन डॉ. विघावे सामाजिक परिवर्तनासाठी झटत आहेत. अंतराळापर्यंत पोहोचणाऱ्या त्यांच्या या प्रवासाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन व्यक्त होत आहे.

# पाकिस्तानच्या ध्वजाची होळी करत दहशतवादी हल्ल्याचा निषेध


### शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचं सोलापुरात आंदोलन

**सोलापूर । प्रतिनिधी**

काश्मीरमधील पहलगाम येथे हिंदू पर्यटकांवर करण्यात आलेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ शिवसेना युवासेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) सोलापूर शहरात रस्त्यावर उतरली. पाकिस्तानचा ध्वज पायदळी तुडवत जाळून संतप्त शिवसैनिकांनी जोरदार घोषणा देत निषेध व्यक्त केला.

पाकिस्तान को जला दो, पत्ता कडवा है पाकिस्तान भडवा है! अशा तीव्र घोषणा देत कार्यकर्त्यांनी पाकिस्तानविरोधी संताप व्यक्त केला. भारत माता की जय, हिंदुस्थान जिंदाबाद, जय भवानी जय शिवाजी अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

शिवसैनिकांनी हल्ल्याच्या निषेधाबरोबरच भारत सरकारला पाकिस्तानात घुसून दहशतवाद्यांचा पूर्ण नायनाट करण्याची मागणी केली. राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न असल्याने आम्ही सरकारसोबत आहोत. पण आता केवळ निषेध नव्हे,



प्रतिउत्तर हवं आहे, असं वक्तव्य यावेळी करण्यात आलं.या आंदोलनात शिवसेना उपजिल्हाप्रमुख शाहूदादा फरतडे, युवासेना उपजिल्हाप्रमुख मयूर यादव, तालुका प्रमुख शंभुराजे फरतडे, उपशहरप्रमुख संतोष भालेराव, शहर प्रमुख समीर हालवाई, शहर समन्वयक प्रसाद निंबाळकर, विभाग प्रमुख अविनाश गाडे, गटप्रमुख मयूर तावरे, कालिदास कदम, शाखाप्रमुख बालाजी वाडेकर, दिगंबर काटुळे, ज्ञानदेव लोंढे, भाऊराव मस्तूद, अनिकेत नवगन, कॉलेज कक्ष तालुकाप्रमुख अमीर कबीर, महेश काळे पाटील, आकाश सरडे, रोहन सरडे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

### दहशतवाद्यांच्या हल्ल्याला रोखठोक प्रत्युत्तर द्या!

# साक्रीत राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे तीव्र निषेध;पाकिस्तानविरोधात घोषणांनी परिसर दणाणला




**धुळे । उमाकांत अहिरराव**

जम्मू-कश्मीरमधील पहलगाम येथे भारतीय पर्यटकांवर पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ साक्री तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) तर्फे जोरदार निषेध आंदोलन छेडण्यात आले. या हल्ल्यात अनेक निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागला. देशभरासह साक्रीतही संतापाची तीव्र लाट उसळली.

धुळे जिल्हाध्यक्ष जितेंद्र मराठे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात कार्यकर्त्यांनी पाकिस्तान मुर्दाबाद, भारत माता की जय अशा जोरदार घोषणांनी परिसर दणाणून सोडला. हल्ल्यात बळी पडलेल्यांना श्रद्धांजली अर्पण करत दोन मिनिटे मौन पाळण्यात आले.या वेळी जिल्हा सरचिटणीस प्रा. नरेंद्र तोरवणे, साक्री तालुकाध्यक्ष गिरीश नेरकर, म. प्र. किसान सभेचे उपाध्यक्ष सयाजीराव ठाकरे, तालुका बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. सुनील नांद्रे, मनिष सोनवणे, सोशल मीडिया प्रमुख हरीश मंडलिक, सरचिटणीस संदीप भामरे, हर्षल ठाकरे, रवींद्र तोरवणे, प्रदीप नांद्रे, सुनील मोहिते, गितेश पाटील, मिलिंद पाटील, गौतम पाटील, नयन कुवर, निखिल खैरनार, विजय पाटील, नंदकुमार बोरसे, मोहन जाधव यांच्यासह अनेक उपस्थित होते.

### महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित लोकनेते व्यंकटराव हिरे

# कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

**नाशिक । प्रतिनिधी**

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पंचवटी, नाशिक यांचा शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ विद्यार्थ्यांच्या मोठ्या उत्साहात पार पडला. या समारंभाचे उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष व महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे समन्वयक डॉ. अपूर्व हिरे यांनी विद्यार्थ्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देऊन केला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना संशोधन क्षेत्रात मोलाची कामगिरी करण्याचे आवाहन केले आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार शिक्षण क्षेत्रात निर्माण होणाऱ्या संधींचा शोध घेऊन देशातील आवश्यक क्षेत्रात नेतृत्व करण्याचा सल्ला दिला.कार्यक्रमामध्ये प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. हरीश आडके, सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे, आणि आदिवासी सेवा समितीचे सहसचिव राजेश शिंदे उपस्थित होते.

या कार्यक्रमात के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय, नाशिकचे अधिष्ठाता डॉ.




सुनील कुटे, प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. अनिरुद्ध धर्माधिकारी, आदर्श प्राथमिक शिक्षक केशव गावित, सोशल नेटवर्किंग फोरम नाशिकचे संचालक प्रमोद गायकवाड, आणि मातोरी येथील नाशिकच्या कृषी कन्या संगीता पिंगळे यांना महाविद्यालयाच्या वतीने नाशिकरत्न या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. बी. एस. जगदाळे, महाविद्यालयाचे प्राचार्य, यांनी केले. यावेळी त्यांनी महाविद्यालयाच्या वार्षिक प्रगतीचा आढावा घेतला आणि हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा व उत्साह देणारा असल्याचे सांगितले.डॉ. सुनील कुटे यांनी पुरस्कार स्वीकारताना विद्यार्थ्यांना विविध भाषा शिकून देश-विदेशातील संधी प्राप्त करण्याचे आवाहन केले. तसेच, आर्टीफिशियल इंटेलिजन्स (-ख) च्या तंत्रज्ञानाच्या काळात भावनिक बुद्धिमत्तेचे महत्त्व पटवून दिले.

केशव गावित यांनी विद्यार्थ्यांना चिकाटीने अध्ययन करून सुजान नागरिक बनण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थिनी करिश्मा शिंदे आणि प्रेरणा जगताप यांचा दिल्ली परेडमध्ये सहभाग घेतल्याबद्दल सन्मान करण्यात आला.

डॉ. राकेश पाटील यांचा स्पुक्टोचे जिल्हा अध्यक्ष म्हणून निवड झाल्याबद्दल सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. हलवार यांनी वरिष्ठ महाविद्यालयाचे अहवाल वाचन केले, तसेच प्रा. के. एन. पाटील यांनी कनिष्ठ महाविद्यालयाचे अहवाल सादर केले. कार्यक्रमाच्या प्रसंगी, क्रीडा विभागाचे अहवाल, एनसीसी व एनएसएस अहवाल, तसेच शैक्षणिक पारितोषिक वाचन करणाऱ्यांमध्ये प्रा. रोहित गिलोत, सविता पिंगळे, डॉ. प्रगती मारकवार यांचा समावेश होता.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दीप्ती देवरे यांनी केले, तर डॉ. प्रगती मारकवार यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाच्या सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# परभणी जिल्ह्यातील बंधाऱ्यांना जीवनदान देण्यासाठी गोदावरी नदी पात्रात पाणी सोडा

### आ.राजेश विटेकर यांची मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांकडे मागणी

**परभणी । प्रतिनिधी**

गोदावरी नदीचे पात्र कोरडे पडल्यामुळे जिल्ह्यातील बंधाऱ्यांमध्ये पाण्याचा साठा नाही. परिणामी, सिंचन व पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर गोदावरी नदी पात्रात जायकवाडी धरणातून पाणी सोडावे, अशी ठोस मागणी आमदार राजेश विटेकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली. मराठवाड्याच्या दृष्टीने दूरदृष्टीने उभारलेले विष्णुपुरी टप्पा दोन अंतर्गत येणारे खडका, मुदगल, तारूगव्हाण, ढालेगाव आणि नाथरा हे साखळी बंधारे सध्या पूर्णपणे कोरडे पडले आहेत. प्रत्येकी १.१० टीएमसी क्षमतेचे हे बंधारे तळ गाठल्याने त्यावर अवलंबून असलेले सुमारे २० हजार हेक्टर क्षेत्र संकटात आहे. या क्षेत्रात ऊस व फळबागांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. याशिवाय सोनपेठ शहरासह अनेक गावांचा पिण्याच्या पाण्यासाठीही या बंधाऱ्यांवर भरवसा आहे.सद्यस्थितीत पाण्याची निकड ओळखून जायकवाडी धरणातून गोदावरी नदी पात्रामार्फत पाणी सोडावे, जेणेकरून वरील बंधारे रिचार्ज होतील व पाणीटंचाई टळेल. यासंदर्भात कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना तातडीने निर्देश देण्यात यावेत, अशी मागणीही आमदार विटेकर यांनी केली.



# मुलांना शाश्वत यशासाठी घडवणारे मिनी महाआसमानी शिबीर संपन्न

### तेजज्ञान फाउंडेशनतर्फे पुण्यातील मनन आश्रमात आयोजन

**पुणे । प्रतिनिधी**

मुलांना हसतखेळत, परंतु अत्यंत प्रभावी पद्धतीने जीवनातील आव्हानांना आत्मविश्वासाने तोंड देण्यास व शाश्वत यशासाठी सज्ज करण्याचे काम करणारे मिनी महाआसमानी शिबीर तेजज्ञान फाउंडेशनतर्फे नुकतेच पुण्यातील सिंहगड रोडवरील मनन आश्रमात आयोजित करण्यात आले.

या शिबिरात एकूण १२२ मुलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. शिबिरादरम्यान मुलांनी भीतीवर मात करणे, चुकीच्या सवयींपासून मुक्त होणे, जीवनाचे ध्येय निश्चित करणे यासारख्या जीवनघडणीच्या महत्त्वपूर्ण कौशल्यांचे प्रशिक्षण घेतले.तेजगुरू सरश्री यांच्या शिकवणींवर आधारित हे शिबीर मुलांच्या जीवनात नीतीमूल्यांचा पाया घालून त्यांना योग्य दिशेने मार्गक्रमण करण्यास मदत करते. यामध्ये मुलांना सोप्या पद्धतीने ध्यान (मेडिटेशन) करणेही शिकवले जाते.आजवर लाखो मुलांना आत्मविश्वास, आनंद, शांती आणि समाधान प्राप्त करून देणाऱ्या या शिबिराच्या यशाचा ध्वज यंदाही उंचावत राहिला.



# विवेकानंद महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र तथा गुणवंत विद्यार्थी पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

**भद्रावती । प्रतिनिधी**

येणारे युग स्पर्धेचे युग आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी स्वतःतील सुप्त कलागुणांना योग्यप्रकारे चालना देऊन आपले व्यक्तिमत्व प्रभावी बनवावे. वाचन वाढवावे.जेणेकरून स्पर्धेच्या युगात आपला टिकाव लागू शकेल, असे विचार गोंडवाना विद्यापीठातील विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. अनिल चिताडे यांनी व्यक्त केले. ते स्थानिक विवेकानंद महाविद्यालयात नुकत्याच झालेल्या पदवी प्रमाणपत्र तथा गुणवंत विद्यार्थी पारितोषिक वितरण समारंभात

प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी विवेकानंद ज्ञानपीठ वरोरा चे अध्यक्ष पुरुषोत्तम स्वान होते.प्रमुख अतिथी म्हणून विवेकानंद ज्ञानपीठ वरोरा चे सहसचिव राजेंद्र गावंडे, बेहरीन रिटर्न सेवानिवृत्त प्रा.धनराज आस्वले , प्राचार्य डॉ. नामदेव उमाटे यावेळी मंचावर उपस्थित होते. अध्यक्षस्थानाहून मार्गदर्शन करताना संस्थाध्यक्ष पू.वा. स्वान यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी पदवी परीक्षांचे अध्ययन करता करता जीवणोपयोगी अनेक कौशल्ये आत्मसात करावे. अर्थातजनाकडे कसे वळता येईल यासाठी प्रयत्न करावे. आई-बाबांच्या स्वप्नपूर्तीसाठी कर्तृत्वशील नागरिक बनावे असे सांगितले. यावेळी उपस्थित पाहुण्यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते २०२३-२४ या शैक्षणिक सत्रातील पदवीधर विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. तसेच महाविद्यालयातील वरिष्ठ व कनिष्ठ गुणवंत विभागातील गुणवंत विद्यार्थ्यांना रोख स्वरूपात पारितोषिके वितरित करण्यात आली या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे असणारा बेस्ट लायब्ररी यूजर पुरस्कार जिनत परवीन पठाण, आदर्श विद्यार्थी पुरस्कार स्नेहल माणूसमारे आणि जिनत परवीन पठाण यांना प्रदान करण्यात आला. यावेळी महाविद्यालयातून इयत्ता १२ वी उत्तीर्ण झालेल्यांपैकी एमबीबीएस व बीएएमएस ला गेलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांचा शॉल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे संचालन डॉ. गजानन खामनकर, प्रा. नरेंद्र लांबट यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. सुधीर आष्टुनकर, आभारप्रदर्शन डॉ. जयवंत काकडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील प्राध्यापक तथा शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी कठोर परिश्रम घेतले.




## तांबा गावातील ग्रा.पं.चा भोंगळ कारभार महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा तीव्र संताप

**तांबा । प्रतिनिधी**

गावातील ग्रामपंचायतीच्या हलगर्जी आणि दुर्लक्षित कारभारामुळे तांबा गावातील नागरिक त्रस्त झाले असून, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने या विरोधात तीव्र भूमिका घेतली आहे. मनसेच्या शाखा अध्यक्ष प्रमोद मडावी यांनी ग्रामपंचायत सचिवांना निवेदन देत प्रशासनाला दोन दिवसांची मुदत दिली आहे, अन्यथा आंदोलनाचा इशारा दिला आहे.

वार्ड क्रमांक तीनमध्ये नळ पाण्याचा अत्यंत गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. काही घरांमध्ये मोटारी असल्यामुळे इतरांना पाणी मिळत नाही. त्याशिवाय पाण्यासाठी घेतले जाणारे कलेक्शनसुद्धा अधिक आहे, अशी तक्रार नागरिकांनी केली आहे.गावात येणाऱ्या मुख्य



रस्त्यावर मोठ्या प्रमाणात ढोर बांधण्यात येत असून, त्या रस्त्याचा वापर एस.टी. बससेससाठी होतो. त्यामुळे ड्रायव्हर आणि प्रवाशांना अडथळा निर्माण होतो. याशिवाय अंकुश डोंगरे व बाबू शहा यांच्या घरासमोरील घाण व साचलेल्या पाण्यामुळे रोगराईचा धोका निर्माण झाला आहे.

शंकर नागपुरे यांच्या घरासमोरील रस्त्यावर खताचे ढिगारे टाकण्यात आले असून, यामुळे दुर्गंधी आणि आरोग्य धोक्यात आले आहे. मनसेने हे सर्व प्रकार त्वरित थांबवून साफसफाई करावी आणि नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी केली आहे.ग्रामपंचायतीने दोन दिवसांत योग्य तो प्रतिसाद दिला नाही, तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा प्रमोद मडावी यांनी दिला आहे.

## महावितरणच्या सहायक अभियंत्यास २ हजारांची लाच घेताना रंगेहाथ अटक

### सोलर नेट मीटरिंगसाठी लाचेची मागणी; लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

**वर्धा । प्रतिनिधी**

सोलर नेट मीटरिंग आणि विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी दोन हजार रुपयांची लाच घेताना महावितरणच्या सहायक अभियंत्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले. ही कारवाई गुरुवारी (दि. २४ एप्रिल) बोरगाव (मेघे) येथील महाराष्ट्र राज्य वीज वितरण कार्यालय परिसरात करण्यात आली. तक्रारीनुसार, संबंधित ग्राहकाच्या घरावर सोलर पॅनल बसविण्यात आले होते. मात्र नेट मीटरिंग प्रक्रिया न झाल्याने ग्राहकाला जास्त वीज बिल येत होते. याबाबत संबंधित कार्यालयात अर्ज सादर करूनही प्रक्रिया पूर्ण



केली जात नव्हती. अखेर सहायक अभियंता मधुसूदन पेठे यांनी नेट मीटरिंगसाठी साडे तीन हजार रुपयांची लाच मागितली.तडजोडीनंतर लाच रक्कम दोन हजार रुपये निश्चित करण्यात आली. तक्रारदाराने तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. पडताळणी करून सापळा रचण्यात आला आणि पेठे यांना लाच स्वीकारताना रंगेहाथ अटक करण्यात आली.

## ब्रिलियंट स्कूल,हिंगणघाट येथे इंग्रजी भाषा दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन

### विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे मनोज्ञ सादरीकरण,मार्गदर्शकांचे बहुमोल विचार




**हिंगणघाट । प्रतिनिधी**

विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट द्वारा संचालित ब्रिलियंट स्कूल येथे इंग्रजी भाषा दिनानिमित्त विविध उपक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात आले. यावेळी अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक अभय दांडेकर उपस्थित होते, तर मार्गदर्शक म्हणून प्रा. संगीता लांडगे आणि प्रा. आशा घाटे (मातोश्री महिला महाविद्यालय, हिंगणघाट) यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व फीत कापून पोस्टर व मॉडेल प्रदर्शन उद्घाटनाने झाली. विद्यार्थ्यांनी इंग्रजी विषयाशी संबंधित विविध मॉडेल्स व पोस्टर्स सादर करताना आपली सृजनशीलता आणि विषयाची समज सप्रमाण सादर केली. उपस्थित मान्यवरांनी प्रत्येक प्रस्तुतीचे कौतुक करत विद्यार्थ्यांचे मनोबल उंचावले.मार्गदर्शन करताना प्रा. संगीता लांडगे यांनी इंग्रजी भाषेच्या जागतिक गरजेवर प्रकाश टाकला आणि याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. प्रा. आशा घाटे यांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रतिकृतींचे कौतुक करत त्यांच्या प्रयत्नांचे अभिनंदन केले.अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक अभय दांडेकर यांनी इंग्रजी भाषेच्या ज्ञानाचे आजच्या स्पर्धात्मक युगातील महत्त्व अधोरेखित केले आणि विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानासोबत भाषेचे ज्ञान आत्मसात करावे असे आवाहन केले.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शिक्षिका सारिका पर्बत यांनी तर आभारप्रदर्शन शिक्षिका जया निखाडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संपूर्ण शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## आमदार आपल्या दारी-२८ एप्रिलपासून जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी समाधान शिबिरांची मालिका

### आ. राजेश बकाने यांच्या पुढाकाराने २९ ठिकाणी शिबिरांचे आयोजन; महसूल व विविध शासकीय विभागांच्या समस्या थेट सोडविण्याचा संकल्प

**देवळी । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत देवळी व हिंगणघाट विधानसभा क्षेत्रात आमदार आपल्या दारी या उपक्रमांतर्गत समाधान शिबिरांची सुरुवात येत्या २८ एप्रिलपासून होणार आहे. या शिबिरांमधून नागरिकांच्या महसूलविषयक तसेच इतर शासकीय विभागांशी संबंधित समस्यांचे त्वरित व ठोस निराकरण करण्याचा मानस आमदार राजेश बकाने यांनी व्यक्त केला आहे.

या उपक्रमासाठी शिबिरांच्या नियोजनार्थ स्थानिक विश्रामगृहात एक महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली. यामध्ये जिल्ह्यातील विविध शासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि भाजप पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीला भाजप जिल्हाध्यक्ष सुनील गफाट, सरचिटणीस राहुल चोपडा, जिपचे माजी अध्यक्ष ज्ञानेश्वर ढगे, शिबिर प्रमुख किशोर दीघे, उपविभागीय अधिकारी दीपक कारंडे, गटविकास अधिकारी प्रफुल्ल लोखंडे, तहसीलदार संदीप पुंडेकर (हिंगणघाट), समर्थ



क्षीरसागर (देवळी), ठाणेदार रवींद्र शिंदे, वीज वितरण विभागाचे अभियंता गोतमारे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता मुत्तेलवार, जिप अभियंता सतीश सुपले आदी अधिकारी उपस्थित होते.

या शिबिरांमध्ये खालील प्रकारच्या समस्या सोडविल्या जाणार आहेत:

महसूलविषयक प्रश्न
जन्म, जात, राहणी प्रमाणपत्र आदी
विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रमाणपत्र
घरकुल मंजुरी व पट्टे वाटप
शेतजमिनीवरील कुळमुक्ती प्रक्रिया
मालमत्तेचे फेरफार व नोंदणी
वीज वितरण विभागाशी संबंधित समस्या
बेघरांना दिनदयाल उपाध्याय योजनेंतर्गत घरकुल सुविधा
कृषी विभागाच्या विविध योजना
पाणंद रस्त्यांचे काम व प्रस्ताव
वर्ग २ चे वर्ग १ मध्ये रूपांतर
संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, व इतर सामाजिक योजना

विधानसभा मतदारसंघातील २९ ठिकाणी हे शिबिरे आयोजित करण्यात येणार असून, प्रत्येक ठिकाणी संबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहणार आहेत. या उपक्रमातून प्रत्येक नागरिकाच्या अडचणीला न्याय देण्याचा संकल्प आम्ही केला आहे, असे आमदार राजेश बकाने यांनी यावेळी सांगितले.या शिबिरांद्वारे शासनाच्या योजनांचा लाभ अधिक प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविण्यास मदत होणार असून, प्रशासन आणि जनता यांच्यातील दुवा अधिक बळकट होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

## पुरुषोत्तम भुतडा यांचे निधन

**वर्धा । प्रतिनिधी**

स्थानिक हवालदारपुरा येथील पुरुषोत्तम शँकरलाल भुतडा (रा.पानवाडी तालुका आर्वी जिल्हा वर्धा. )यांचे आज २५ एप्रिल रोजी शुक्रवारी पहाटे ४ वाजता कर्करोगाच्या आजाराने निधन झाले. ते ७५ वर्षाचे होते. त्यांच्यावर आज स्थानिक हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, तीन मुली आणि दोन मुलं असा बराच मोठा आप्तपरिवर



आहे. ते भाजपाचे जेष्ठ नेते व पाणवाडी येथील दीर्घ काळ सरपंच म्हणून कार्यरत होते.

## काश्मीरच्या पहलगामहून वर्धा जिल्ह्यातील ४० डांगरी समाज बांधव सुखरूप परतले

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या तत्परतेने खास विमान व बसची व्यवस्था

**पुलगाव । प्रतिनिधी**

काश्मीरमधील पहलगाम येथे नुकत्याच झालेल्या अतिरेकी हल्ल्यात २८ निष्पाप लोकांचा मृत्यू झाला असून, देशभरातून या घटनेचा तीव्र निषेध नोंदवला जात आहे. या पार्श्वभूमीवर वर्धा जिल्ह्यातील सुमारे ४० प्रवासी, जे त्या वेळी काश्मीरमध्ये पर्यटनासाठी गेले होते, ते सर्वजण सुखरूप परतले आहेत.हे सर्व प्रवासी डांगरी समाजाचे असून, सहलीसाठी गेले होते. अतिरेकी हल्ल्याच्या वेळी हे प्रवासी पहलगामपासून काही अंतरावर होते. घटनेची माहिती मिळताच सीआरपीएफच्या जवानांनी तत्काळ प्रतिक्रिया देत, या सर्व प्रवाशांना त्यांच्या तंबूंमध्ये सुरक्षित ठेवले व सलग चार दिवस त्यांची काळजी घेतली.

या परिस्थितीत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः काश्मीरमध्ये पोहोचून या प्रवाशांना विशेष विमानाने मुंबईत आणले आणि तेथून खासगी बसद्वारे वर्धा जिल्ह्यात रवाना केले. या प्रवाशांमध्ये पुलगावजवळील आफ्टी गावातील ६, नाचणगावचे २, गुंजखेडा येथील २, हिंगणघाट येथील २२ आणि नागपूरमधील १२ लोकांचा समावेश होता. यामध्ये माजी सैनिक मोहन जुमडे व ज्ञानेश्वर जुमडे यांचा देखील समावेश होता.पुलगाव येथे पोहोचल्यावर प्रवाशांसाठी नाश्ता आणि चहा-पाण्याची विशेष व्यवस्था करण्यात आली होती. ही व्यवस्था नाचणगाव येथील मंगेश रावेकर, प्रदीप जुमडे, डॉ. निलेश गुल्हाने, प्रवीण नांदे, बाळा सहागडकर, हनुमान कात्रे इत्यादी समाज बांधवांनी केली.



## इरई नदी खोलीकरण अभियानाचा शुभारंभ

# सर्वांच्या सहकार्यातून इरई नदीचा चेहरा मोहरा बदलणार-पालकमंत्री डॉ.अशोक उईके



**चंद्रपूर (प्रतिनिधी) :चंद्रपूर शहराच्या प्रवेशद्वारावरच इरई नदीचे दर्शन होते.शहराला१कि.मी.समांतर वाहणारी ही नदी एकप्रकारे चंद्रपूर शहराचे नाक आहे.त्यामुळे ती सुंदरच असायला पाहिजे.इरईचे खोलीकरण आणि सौंदर्यीकरण करणे हे केवळ एका व्यक्तिचे काम नव्हे तर यात शासन आणि प्रशासनासह सर्व लोकप्रतिनिधी,सामाजिक संघटना,नागरिकांचेसुध्दा योगदान असणे आवश्यक आहे.त्यामुळेच लोकसहभागातून आणि सर्वांच्या सहकार्यानेच इरई नदीचा चेहरा मोहरा बदलण्याचा आपला मानस आहे,असे विचार राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.अशोक उईके यांनी व्यक्त केले. जिल्हा प्रशासनद्वारे इरई नदी खोलीकरण अभियानाचा शुभारंभ करताना ते बोलत होते.यावेळी आमदार सुधीर मुनगंटीवार, आमदार किशोर जोरगेवार, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.,मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंग,मनपा आयुक्त विपीन पालीवाल, अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील ,उपायुक्त मंगेश खवले, औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता विजय राठोड, निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार आदी उपस्थित होते.**

इरई नदी खोलीकरणाच्या कामाचे जिल्हा प्रशासनाने उत्तम नियोजन केले आहे,असे सांगून पालकमंत्री डॉ.उईके म्हणाले,लोकसहभागातून हे खोलीकरण अभियान नक्कीच यशस्वी होईल.ही आपली नदी आहे,हे आपले अभियान आहे,अशी भावना प्रत्येक नागरिकांनी ठेवावी.तसेच या अभियानाबद्दल जास्तीतजास्त जनजागृती करावी,जेणेकरून लोकांचा यात मोठ्या प्रमाणात सहभाग.या नदीचे खोलीकरण आणि स्वच्छता ही दोन्ही कामे हाती घेण्यात येईल.आजपासून४५दिवस हे अभियान निरंतर चालणार आहे.प्रत्येक दिवसाचे जिल्हा प्रशासनाद्वारे नियोजन करण्यात आले आहे.विरोधकांनी इरई नदीच्या अभियानात सहभाग घ्यावा:केवळ नावासाठी विरोध करून इरई नदी स्वच्छ होणार नाही.त्यामुळे विरोधकांनी सुद्धा या अभियानात सामील व्हावे.नदीच्या खोलीकरण अभियानाबद्दल कोणीही शंका-कुशंका मनात आणू नये.आपल्या जिल्ह्याची बदनामी होणार नाही,याचीसुद्धा दक्षता घ्यावी.इरई नदीच्या खोलीकरणातून चंद्रपूरचा सन्मान वाढेल,अशी अपेक्षा पालकमंत्री डॉ.अशोक उईके यांनी व्यक्त केली.यावेळी पालकमंत्री डॉ.उईके यांनी,मंत्री म्हणून त्यांना मिळणारे वेतन आणि भत्ता असे एकूण५लक्ष रुपयांचा धनादेश इरई नदीच्या खोलीकरण अभियानासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे सुपूर्द केला.

पालकमंत्री डॉ.अशोक उईके यांच्या नेतृत्वात लोकसहभागातून इरई नदी खोलीकरणाचा शुभारंभ होत आहे,हा अतिशय आनंदाचा क्षण आहे.नदी खोलीकरणासाठी वेगवेगळ्या स्त्रोतांतून निधी गोळा होईल.मात्र अधिकारी आणि कर्मचारीसुध्दा आपले वेतन देतात,ही अभिमानाची बाब आहे.नद्यांबाबत नागरिकांमध्ये गंभीरता असावी.मंत्री असताना जलतज्ज्ञ राजेंद्र सिंह यांच्या सहकार्यातून आपण राज्यात१०८नद्यांच्या पुनरुज्जीवनाचे काम हाती घेतले होते.इरई नदीमध्ये ओव्हर बर्डन जास्त जमा होत असल्याने डब्ल्यूसीएल आणि सीटीपीएस यांचे योगदान महत्त्वाचे आहे.इरई नदीच्या१७कि.मी.साठी दीर्घकालीन उपाययोजना करणे आवश्यक आहे.पावसाच्या पाण्याचा प्रत्येक थेंब जमिनीत जिरवण्यासाठी उत्तम नियोजन व्हावे,तसेच हे अभियान निरंतर चालावे.पर्यावरण तज्ज्ञांचीसुद्धा एक स्थायी स्वरूपाची समिती यासाठी गठित करावी,असे आमदार मुनगंटीवार म्हणाले.यावेळी त्यांनी आपला एक महिन्याचा पगार या अभियानासाठी देत असल्याचे जाहीर केले.नद्यांच्या काठावर मानवी वस्ती वसली आहे.चंद्रपूर जिल्ह्यात इरई,झरपट,वैनगंगा,वर्धा या नद्या वाहतात.पहिल्या टप्प्यात इरई नदीचे खोलीकरण व त्यानंतर सौंदर्यीकरण करण्यात येणार आहे.हे संपूर्ण अभियान प्रशासनाने पूर्ण क्षमतेने राबवावे,असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.पुढे ते म्हणाले,जिल्हा प्रशासनाने कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले आहे. १७किलोमीटरची जीवनवाहिनी असलेल्या या नदीवर आणखी तीन ते चार बंधारे बांधण्याचे नियोजन करावे.तसेच धानोरा बॅरेज प्रकल्प आगामी काळात पूर्ण करण्यात यावा.इरई नदी पूर संरक्षण भिंतीचा प्रस्ताव शासन स्तरावर मार्गी लावावा,अशी मागणी त्यांनी केली.यावेळी त्यांनी२लक्ष५५हजार रुपयांचा धनादेश अभियानासाठी पालकमंत्र्यांकडे सुपुर्द केला.यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा म्हणाले,आज अतिशय महत्त्वकांक्षी कामाचा शुभारंभ होत आहे.चंद्रपूर शहरात पावसाळ्यात दरवर्षी पूर परिस्थिती निर्माण होते.इरई नदी ही चंद्रपूरची लोकवाहिनी आहे.त्यामुळे तिला वाचवणे आपले कर्तव्यच आहे. १७कि.मी.च्या तीन टप्प्यात एकूण५लक्ष ब्रास गाळ,वाळू मिश्रित गाळ नदीतून काढण्याचे नियोजन आहे.शेतकऱ्यांना हा गाळ मोफत देण्यात येईल.त्यामुळे त्यांची शेती सुपीक होण्यास मदत होईल.घरकुल लाभार्थ्यांना या नदीतील वाळू मोफत देण्यात येणार आहे तर शासकीय व इतर कंत्राटदारांना अल्प दरात वाळू मिळेल,असे त्यांनी सांगितले.प्रास्ताविकात मनपा आयुक्त विपीन पालीवाल म्हणाले,नदी असलेली शहरे ही भाग्यवान असतात.विकासाच्या भारामुळे इरई नदी घुसमटत आहे.त्यामुळे खोलीकरणाचा आज शुभारंभ करण्यात आला.यासाठी पालकमंत्र्यांनी दोन महिन्यांपूर्वीच आराखडा तयार केला आणि लोकसहभागाने हे अभियान राबविण्याच्या सूचना केल्या.या अभियानात शासन-प्रशासन,यांच्यासोबतच लोकप्रतिनिधी,सामाजिक संघटना व सर्वांचा सहभाग आवश्यक आहे.चंद्रपूर महानगरपालिकेला नुकतेच८लक्ष रुपयांचे दोन पुरस्कार मिळाले असून दोन्ही पुरस्काराची रक्कम या अभियानासाठी देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.तत्पुर्वी मान्यवरांच्या हस्ते खोलीकरणाच्या यंत्रसामुग्रीचे उद्घाटन आणि नदीच्या पात्रात कुदळ मारून खोलीकरणाचा शुभारंभ करण्यात आला.कार्यक्रमाचे संचालन रिध्दी उईके यांनी तर आभार अधिक्षक अभियंता प्रवीण झोड यांनी मानले.



# आदिवासी व ग्रामीण तरुणांसाठी आदरतिथ्य क्षेत्रातील कौशल्य विकासाचे प्रशिक्षण

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

पंतप्रधान यांच्या 'स्किल इंडिया मिशन'शी सुसंगत राहून चंद्रपूर वन अकॅदमीने महाराष्ट्रातील व्याघ्र प्रकल्प व संरक्षित जंगल परिसरातील गावांमध्ये राहणाऱ्या बेरोजगार तरुणांसाठी हाऊसकीपिंग व फूड ॲण्ड बेव्हरेज सेवा या आदरातिथ्य क्षेत्रातील प्रशिक्षणासाठी ही अभिनव योजना सुरू केली आहे. या अनुषंगाने 'प्रथम' या राष्ट्रीय पातळीवरील शिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण संस्थेसोबत सामंजस्य करार (चेण) करण्यात आला आहे.



या करारावर अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा वन अकादमीचे संचालक एम. श्रीनिवास रेड्डी यांनी स्वाक्षरी केली. त्यांच्या नेतृत्वाखाली या प्रशिक्षण कार्यक्रमाचा कालावधी ६० दिवसांचा असून प्रशिक्षण, निवास, भोजन व नोकरीची व्यवस्था याचा संपूर्ण खर्च अकादमी आपल्या आंतरिक निधीतून करत आहे. ही योजना वनालगताच्या गावातील तरुणांना सक्षम बनवते, तसेच पर्यायी उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून देऊन वनसंवर्धनालाही हातभार लावते.

मेलघाट व्याघ्र प्रकल्पाजवळील गावांतील १२ तरुणांचा आठवी हाउसकीपिंग बॅच २० फेब्रुवारी ते २० एप्रिल २०२५ या कालावधीत प्रशिक्षणासाठी चंद्रपूर अकॅदमीत उपस्थित होती. आतापर्यंत हाऊसकिपिंग बॅचेस मध्ये एकूण ११० तसेच फूड आणि बेवरेज मधील एकूण ९९ जणांना यशस्वीरित्या प्रशिक्षण करून श्री, फोर, फाईव्ह स्टार हॉटेल्स, रिझॉर्टमध्ये नोकरी देण्यात आली आहे. तसेच हाउसकीपिंग सहाय्यकाचे दोन महिन्याचे प्रशिक्षण पूर्ण करून त्यांना उदयपूर, लोणावळा, ताडोबा, चंद्रपूर या ठिकाणी जॉब प्लेसमेंट देण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे संचालक एस के. गवळी यांच्या हस्ते प्रशिक्षण प्रमाणपत्र, जॉब ऑफर लेटर प्रदान करण्यात करण्यात आले व नेमणूकीच्या ठिकाणी जाण्यासाठी मुक्त करण्यात आले.चंद्रपूर वन अकादमी मार्फत हा कार्यक्रम पुढील तीन वर्षात राबविण्यासाठी प्रथम एज्युकेशन फाउंडेशन मुंबई यांच्याशी दिनांक २४ एप्रिल २०२५ रोजी समझोता केला असून त्या अंतर्गत वेगवेगळ्या पाच कौशल्य कामासाठी जसे की, फोर व्हीलर टेक्निशियन असिस्टंट इलेक्ट्रिशियन, वेल्डर, हॉस्पिट्यालिटी असिस्टंट व मल्टी फंक्शन ऑफिस असिस्टंट आणि ब्युटीशियन अशा कौशल्य कामी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सदरचे प्रशिक्षण महिलांसाठी देखील उपलब्ध आहे. तरी त्याचा फायदा सर्व संबंधित गावातील तरुणांनी घ्यावा,असे आवाहन श्री. रेड्डी यांनी केले आहे.

# चंद्रपूर जिल्ह्यातील सात तालुक्यात काँग्रेसची आढावा बैठक

## आमदार अभिजितदादा वंजारी यांनी केला दौरा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार आणि चंद्रपूर जिल्ह्याचे निरीक्षक तसेच विधान परिषदेचे मुख्य प्रतोद आमदार अभिजितदादा वंजारी यांच्या अध्यक्षतेखाली चंद्रपूर जिल्ह्यातील ७ तालुक्यांमध्ये काँग्रेस कमिटीच्या संघटनात्मक आढावा बैठका आयोजित करण्यात आल्या.



या बैठका २४ एप्रिल रोजी चिमूर, नागभीड, ब्रह्मपुरी, सिंदेवाही, सावली, मूल, आणि बल्लारपूर तालुक्यांमध्ये पार पडल्या. बैठकीत जिल्हा प्रभारी मुजीब पठाण आणि स्थानिक काँग्रेस पदाधिकाऱ्यांसोबत काँग्रेस पक्षाची संघटनात्मक स्थिती, कार्यकर्त्यांचे मनोबल, आणि आगामी निवडणुकींसाठी तयारीवर सखोल चर्चा करण्यात आली.

चिमूर येथे झालेल्या बैठकीत माजी आमदार अविनाश वारजुरकर, डॉ. सतीश वारजुरकर, आणि धनराज मुंगले उपस्थित होते. नागभीड येथे प्रमोद चौधरी, माजी तालुकाध्यक्ष प्रफुल्ल खापर्डे, आणि डॉ. सतीश वारजुरकर उपस्थित होते. ब्रह्मपुरीमध्ये तालुकाध्यक्ष खेमराज तिडके आणि माजी जिल्हा परिषद सदस्य राजेश कांबळे यांनी बैठकीला उपस्थिती दर्शवली. सिंदेवाही आणि सावलीमध्ये तालुक्याचे कार्यकर्ते, तसेच काही वरिष्ठ नेत्यांची उपस्थिती होती.

मूल आणि बल्लारपूर येथील बैठकीत प्रमुख काँग्रेस नेते उपस्थित होते, ज्यात खासदार प्रतिभा धानोरकर, माजी आमदार सुभाष धोटे, आणि माजी नगराध्यक्ष घनश्याम मुलचंदानी यांचा समावेश होता.आमदार अभिजित वंजारी यांनी कार्यकर्त्यांना संघटन मजबूत करण्याचे आणि जनसंपर्क वाढवण्याचे आवाहन केले.

# समाजकारणातून राजकारणात यशस्वी वाटचाल करणाऱ्या सावंत कुटुंबाचे करमाळा तालुक्याच्या विकासासाठी महत्वपुर्ण योगदान-आ.नारायण पाटील

**सोलापूर । प्रतिनिधी**

समाजकारणातून राजकारणात यशस्वी वाटचाल करणाऱ्या सावंत कुटुंबाचे करमाळा तालुक्याच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे मत करमाळा तालुक्याचे आमदार नारायण आबा पाटील यांनी व्यक्त केले. नगरसेवक संजय उर्फ पप्पू भगवान सावंत यांच्या वाढदिवसानिमित्त सावंत गल्ली येथे छत्रपती शिवाजी महाराज तरुण मंडळाच्या वतीने आयोजित भव्य नागरी सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते.

या कार्यक्रमात करमाळ्याचे लोकप्रिय आमदार नारायण आबा पाटील, ज्येष्ठ पत्रकार आणि ग्रामसुधार समितीचे अध्यक्ष ड बाबुराव हिरडे, आदिनाथचे माजी संचालक डॉ. वसंत पुंडे, शिवसेना जिल्हा उपप्रमुख संजय शिंदे, नगरसेवक अल्लाफ शेठ तांबोळी, नगरसेवक प्रशांत ढाळे, शिवसेना शहराध्यक्ष प्रवीण कटरिया, आदिनाथ कारखान्याचे नूतन संचालक डॉ. हरिदास केवारे, ड राहुल सावंत, देवानंद बागल, डॉ. अमोल घाडगे, सावंत गटाचे नेते पै. सुनील सावंत, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष हनुमंत मांढरे पाटील, माजी नगरसेवक रवींद्र कांबळे, नगरसेवक अतुल फंड, गोविंद किरवे, ड नवनाथ राखुंडे, उद्योजक आणि भावी नगरसेवक अल्लाउद्दीन शेख, ड बलवंत राऊत, राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष अरुण काका जगताप, अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था करमाळा तालुका अध्यक्ष संतोष काका कुलकर्णी, सुनील सावंत, करमाळा तालुका डिजिटल मीडिया पत्रकार संपादक संघटनेचे अध्यक्ष दिनेश मडके, दैनिक सकाळचे पत्रकार आण्णा काळे , कमलाई नगरीचे संपादक जयंत दळवी, फारुख जमादार उपस्थित होते.आमदार नारायण आबा पाटील यांनी पुढे बोलताना सांगितले की, समाजकारणातून राजकारणात यशस्वी वाटचाल करणारे सावंत कुटुंबाने राजकारणात 'किंगमेकर'ची यशस्वी भूमिका बजावली आहे. आदिनाथ कारखाना, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत सावंत गट ज्यांना पाठबळ देतो, त्यांना



विजय मिळवता येतो, अशी समीकरणे तयार झाली आहेत. शहरा आणि तालुक्यात सावंत गट हाच जनतेच्या मनातील एक प्रमुख घटक बनला आहे.यावेळी नगरसेवक संजय उर्फ पप्पू सावंत यांचे काम जनतेसाठी आदर्श असून, ते सर्वसामान्य जनतेच्या सेवेसाठी सदैव तत्पर राहून काम करत आहेत. आमदार पाटील यांनी त्यांचे भविष्य उज्ज्वल असले आणि त्यांच्या वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

तसेच, त्यांनी सावंत गल्ली येथील हनुमान मंदिरासाठी सभा मंडपासाठी ३० लाख रुपये निधी मंजूर करणार असल्याचे सांगितले.सावंत कुटुंब आणि पाटील कुटुंबाचे संबंध चार पिढ्यांपासून असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले आणि आपल्या राजकारणापेक्षा प्रेमाचे, कोटुंबिक जिव्हाळ्याचे अतुट नाते असल्याचे व्यक्त केले.कार्यक्रमात जेष्ठ पत्रकार बाबुराव हिरडे, डॉ. अमोल घाडगे, ड राहुल सावंत, नगरसेवक अल्लाफ शेठ तांबोळी, शिवसेना शहरप्रमुख प्रवीण कटरिया, आणि इतर मान्यवरांनी नगरसेवक संजय उर्फ पप्पू सावंत यांना शुभेच्छा दिल्या.आमदार नारायण आबा पाटील यांनी आदिनाथ सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत एकहाती विजय मिळवल्याबद्दल शाल, श्रीफळ आणि मानाचा फेटा बांधून त्यांचा सत्कार केला.कार्यक्रमाच्या शेवटी, नगरसेवक संजय उर्फ पप्पू सावंत यांचा शाल, श्रीफळ, मानाचा फेटा, पुष्पहार घालून केक कापून सत्कार करण्यात आला. हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि आनंदात संपन्न झाला.सावंत कुटुंबाच्या समाजसेवेचा वारसा जपण्याचे काम काका विठ्ठल आप्पा सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहे. संजय उर्फ पप्पू सावंत यांनी सांगितले की, सर्वसामान्य जनतेच्या पाठबळावर आपली कामे चालू आहेत. लवकरच करमाळा शहरात बेरोजगारीच्या समस्या दूर करण्यासाठी मोठा उद्योग उभा करणार आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .